म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ५५१

१९२०

REFBK-0001825
REFBK-0001825

काव्य ९८८

# तिलकस्तवराज.

REFBK-0001825
REFBK-0001825

हें काव्य

भालचंद्र शंकर देवस्थळी,

राजा भोज, यक्षसंदेश, सुरतकलहशतक, पंचमजार्जराज्याधिरोहण-
पूर्वार्ध व उत्तरार्ध, इत्यादि काव्यांचे कर्ते, यांनीं लिहिलें.

BHAVE & CO.
HOMERULE DEPOT-Thakurdwar, Bombay

ते
मुंबईत
'निर्णयसागर' छापखान्यांत छापिलें.

सन १९२०.

किंमत ६ आणे.

पब्लिशर—भालचंद्र शंकर देवस्थळी, डांगे मामलेदार यांचें घर,
मैदानचा आड, अहमदनगर.

---

प्रिंटर—रामचंद्र येसु शेडगे, निर्णयसागर प्रेस,
२३ कोलभाटलेन, मुंबई.

# दोन शब्द.

पुण्यश्लोक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक निजधामास जाऊन आज दोन महिने झाले आहेत. त्यांच्या निधनानें निखिल आर्यावर्ताची केवढी भयंकर व अपरिहार्य हानि झाली आहे, ह्याची यथार्थ कल्पना म्हटली म्हणजे सर्वत्र सर्व पक्षांचे व सर्व वर्णांचे लोक–मग ते राष्ट्रीय असोत वा प्रागतिक असोत, ब्राह्मण असोत वा अब्राह्मण असोत, हिंदु, ख्रिस्ती, पारशी, मुसलमान, इतकेंच नव्हे, तर त्यांचे हयातींतील त्यांचे कट्टे शत्रु, कोणीहि असोत,–आज त्यांजकरितां सारखे हळहळत आहेत, यावरून होणारी आहे. त्याचप्रमाणें त्यांच्या निधनदिवशीं स्मशानयात्रेच्या वेळीं जो अश्रुतपूर्व व अदृष्टपूर्व देखावा दृष्टोत्पत्तीस आला त्यावरूनहि लोकमान्यांविषयींचा जनतेच्या मनांतील आदर उत्तम प्रकारें कळून येण्यासारखा आहे. अशा पुरुषाच्या पुण्यकीर्तीचें कीर्तन व श्रवण हीं देशाभिमानादि राष्ट्रीय सद्गुणांची जागृति जनतेच्या मनांत उत्पन्न करणारीं उत्तम साधनें असल्यामुळें वर्तमानपत्रांतून, मासिकांतून व स्वतंत्र पुस्तकरूपानें लोकमान्यांचीं शेंकडों गुणस्तोत्रें प्रसिद्ध झालीं आहेत व होतहि आहेत. हा अल्पसा प्रयत्नहि त्याच दृष्टीनें केला आहे; तरी तो रसिक वाचकांच्या आदरास पात्र होईल अशी आशा आहे.

ह्या पुस्तकास प्रस्तावनेच्या रूपानें दोन शब्द लिहिण्याविषयीं लोकमान्यांचे सहाध्यायी व परम मित्र श्री. भाऊसाहेब चौकर, वकील, यांस मीं विनंती केली होती. ती, माझा परिचय नसतांहि त्यांनीं मोठ्या आनंदानें मान्य केली व या पुस्तकास आपल्या प्रस्तावनेनें भूषवून मला ऋणी केलें याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होणार आहेत.

याशिवाय माजी 'अध्यापक' मासिकाचे विद्वान् संपादक वे. शा. संपन्न रा. रा. गोविंद विष्णु फडके, डॉ. लक्ष्मण नीलकंठ पुरोहित, डॉ. यज्ञेश्वर शंभु तळेकर, रा. विश्वनाथ त्र्यंबक रानडे बी. ए., त्याचप्रमाणें 'निर्णयसागर,' 'इंदुप्रकाश' व 'मनोरंजन' छापखान्यांचे मालक यांनीं पुस्तकाचें अंतरंग व बहिरंग सजविण्याचे कामीं मला मदत केली त्याबद्दल या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहें.

अहमदनगर,<br>
ता. २२।१०।२०.

भालचंद्र शंकर देवस्थळी.

# प्रस्तावना.

कै० जगद्विख्यात लोकमान्य **बाळ गंगाधर टिळक** त्यांच्या स्तुतिपर ग्रंथ वे. शा. सं. रा. रा. भालचंद्र शंकर देवस्थळी त्यांनीं लिहिला आहे, व त्यास त्यांनीं 'तिलकस्तवराज' असें नांव दिलें आहे. अशा ग्रंथास वास्तविक प्रस्तावना लिहिण्याची मुळींच आवश्यकता नाहीं; परंतु लोकमान्यांचा व माझा शेचाळीस वर्षांचा स्नेह होता; व त्यांचा मी कट्टा अभिमानी व त्यांच्या मतांशीं माझीं मतें तंतोतंत जुळत होतीं, ही गोष्ट ग्रंथकर्त्यास माहीत असल्यामुळें व सध्यां ते येथेंच नोकरीवर असल्यामुळें मला त्यांनीं प्रस्तावना लिहिण्यास सांगितलें व तें काम योग्यता नसतांहि मीं आनंदानें करण्याचें कबूल केलें. लोकमान्यांचे निधनानंतर त्यांचे असंख्य भक्तांनीं आपापले परीनें त्यांचें गुणवर्णन गद्य व पद्य या दोनी तऱ्हेनें वर्तमानपत्रांतून व मासिक पत्रकांतून केलें आहे व अद्यापहि करीत आहेत. कांहीं लोकांनीं त्यांच्या आठवणी म्हणून व कांहींनीं त्यांचीं त्रोटक चरित्रें म्हणून लेख प्रसिद्ध केले आहेत, परंतु हा 'स्तवराज' किंचित् निराळ्या प्रकारचा आहे. हा 'स्तवराज' पद्यात्मक असून प्रायः आर्या-वृत्तांत आहे. याचीं कवीनें प्रथमतः 'मंगलाचरण' आणि पुढें १ 'जन्म, बालपण वगैरे'; २ 'जनसेवा व तत्प्रीत्यर्थ आत्मयज्ञ'; ३ 'गुणवर्णन'; व ४ 'आर्यभूविलाप,' अशीं चार प्रकरणें केलीं आहेत. मंगलाचरणाचे आरंभीं एक श्लोकार्ध आहे. त्यांतील सोळा अक्षरें क्रमानें सोळा आर्यांच्या आरंभीं साधलीं आहेत. पुढील तीन प्रकरणांतहि आरंभीं एक कविता असून त्यांतील अक्षरें त्या त्या प्रकरणांतील आर्यांच्या आरंभीं साधलीं आहेत. शेवटील 'आर्यभूविलाप'नामक प्रकरणांत विविधवृत्तात्मक कविता आहे. याप्रमाणें एकंदर १७५ कविता आहेत. यमक व विशिष्ट आद्याक्षरें साधणें हीं दोन बंधनें असूनहि क्लिष्टपणा कोठेंहि आढळत नाहीं, हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. भाषा शुद्ध असून एकंदर कविता भारदस्त, प्रौढ, प्रासादिक असून चांगली साधली आहे. ह्या कविता मराठी शाळेंतील मुलांमुलींना बिनदिक्कत शिकवाव्या

असें माझें मत आहे. अर्वाचीन कवींमध्यें जे नांवाजलेले म्हणून कवि आहेत, त्यांचे पंक्तीस 'देवस्थळी' यांस बसविण्यास मुळींच हरकत नाहीं. एवढेंच नव्हे, परंतु त्यांच्यामध्यें ह्यांना बरेंच वरचें स्थान द्यावें लागेल. महाराष्ट्र वाचकांस 'देवस्थळी' यांचें नांव अगदीं अपरिचित आहे असें नाहीं. त्यांच्या कविता 'नवयुग,' 'खेळगडी,' 'आनंद' वगैरे मासिकांत प्रसिद्ध झाल्या आहेत. प्रस्तुत काव्यांत संस्कृत शब्द जरी बरेच असले तरी ते काव्यांमध्यें नेहमीं येणारे, सोपे व सहज समजण्याजोगे आहेत. हा कांहीं चरित्रग्रंथ नाहीं, आणि यास 'स्तवराज' म्हणून कवीनें नामाभिधान दिलें आहे, तरी यांत अवास्तव अथवा फाजील स्तुतीचा भाग मुळींच नाहीं. यांतील गुणवर्णन याथातथ्य आहे, हा ह्या कवितेंतील विशेष आहे. हा 'स्तवराज' वाचून (पहा प्रकरण ३ रें आर्या ३३) ता. ३ माहे आगष्ट १९२० च्या केसरींत लोकमान्यांसंबंधें जो 'निधनलेख' आला आहे, त्यांत 'लोकमान्य' ही पदवी एका अर्थानें किंचित् हलक्या प्रतीची होती, असें ध्वनित केल्याचें एका विद्वान् मित्रांनीं माझ्या नजरेला आणलें होतें, त्या गोष्टीची मला आठवण झाली. आणि या कवितेमुळेंच मला एक कल्पना सुचली आहे, ती महाराष्ट्रांतील सर्व लोकांपुढें विचाराकरितां मांडण्याचें मी धाडस करितों. ती अशीः–कै० **बाळ गंगाधर टिळक** हे हयात असतांना त्यांना आपण सर्व 'लोकमान्य' असें म्हणत होतों. परंतु त्यांचे आंगीं लोकोत्तर गुण होते व त्यांचें चरित्र आमरणांत निर्मळ, शुद्ध व पवित्र असें होतें. महाराष्ट्रांतील, किंबहुना सर्व हिंदुस्थानांतील लोकांचे मार्गदर्शक म्हणूनहि त्यांची सर्वत्र कीर्ति झालेली आहे. तरी त्यांचें स्मरण सदैव आपणांस व्हावें म्हणून त्यांचे निधनानंतर त्यांना 'पुण्यश्लोक' **बाळ गंगाधर टिळक**, अथवा 'पुण्यश्लोक **टिळक**' असें सर्वांनीं त्यांस म्हणावें. आपल्या प्रातःस्मरणांत नल, युधिष्ठिर, वैदेही वगैरे, ह्यांचें 'पुण्यश्लोक' म्हणून आपण स्मरण करित असतों. लोकमान्य **टिळक** हेहि 'अनभिषिक्त राजे' होते व त्यांची असंख्य लोकांवर, विधियुक्त अभिषेक झाला नसतांहि, सत्ता अबाधित चालली होती व निधनानंतरहि चालत आहे. त्यांचें खासगी व समाजांतलें वर्तन निर्मल, शुद्ध व पवित्र होतें, ही गोष्ट सर्व लोकांस मान्य आहे; तेव्हां त्यांस 'पुण्यश्लोक' म्हणणें हें यथायोग्य आहे असें मला वाटतें. आणि 'केसरी'मध्यें "यापुढें 'लोकमान्य' ही पदवी असामान्यच राहूं दिली पाहिजे, दुसऱ्या

कोणाला ती पदवी देऊं नये" असें जें लिहिलें आहे, त्यांतील मर्म एवढेंच कीं, टिळक हे 'लोकोत्तरमान्य' होते व अशा लोकांना आपण 'पुण्यश्लोक' म्हणत आलों आहोंत. तरी ही सूचना सर्वांना पसंत पडून यानंतर 'पुण्यश्लोक टिळक' या नांवानें त्यांचा सर्वांनीं उल्लेख करण्याची पद्धत सुरू करावी अशी माझी सर्व लोकांस सविनय प्रार्थना आहे. हा 'स्तवराज' छापून प्रसिद्ध करावा; व छपाई व इतर खर्च वजा जातां जें उत्पन्न होईल, त्यांतून 'पुण्यश्लोक टिळकां'चे स्मारक फंडास व मुंबईच्या 'ब्राह्मणसभे'च्या फंडास निदान शंभर रुपये विभागून द्यावे असें रा. देवस्थळी यांचे मनांतून आहे. तरी या पुस्तकाची निदान एकएक प्रत प्रत्येक महाराष्ट्रीयानें विकत घेऊन आपल्या घरांतील तरुण मुलांमुलींच्या पुढें हा उत्तम कित्ता म्हणून लहानपणापासून मांडावा, म्हणजे आपणांस आपलें ध्येय गांठण्यास फार वेळ लागणार नाहीं. शेवटीं वे. शा. सं. रा. रा. भालचंद्र शंकर देवस्थळी यांच्या सर्वोत्कृष्ट कृतीचें अभिनंदन करून, त्यांनीं ह्या रीतीनें महाराष्ट्रावर जे उपकार केले आहेत त्यांबद्दल आपली कृतज्ञता दर्शवून, आणि जगन्नियंत्या परमेश्वराजवळ या भरतवर्षाच्या संतानांना जागृत करून, त्यांच्यामध्यें जिज्ञासा उत्पन्न करून, त्यांना सर्वप्रकारें शक्तिसंपन्न करून, त्यांचा उत्कर्ष कर आणि त्यांस त्यांचें प्राचीन उच्चतम पद प्राप्त करून दे अशी नम्र प्रार्थना करून ही प्रस्तावना पुरी करितों.

अहमदनगर,<br>ता. १५ आ. १९२०.

विनायक बळवंत चौकर.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| दोन शब्द. … … … … … … … | १–२ |
| प्रस्तावना. … … … … … … … | १–३ |
| मंगलाचरण. … … … … … … … | १–२ |
| १ प्रकरण–जन्म, बालपण वगैरे. … … … … | ३–७ |
| २ ,, जनसेवा व तत्प्रीत्यर्थ आत्मयज्ञ. … … … | ८–११ |
| ३ ,, गुणवर्णन. … … … … … … | १३–१७ |
| ४ ,, आर्यभूविलाप. … … … … … | १९–२४ |

# तिलकस्तवराज.

सं. क्रां ८५८

## मंगलाचरण.

'लोकमान्याय बालाय तिलकाय नमोऽस्तु ते.'

ग्रंथ संग्रहालय ठाणे १८२५

आर्या.

लोकोत्तरचरिता तुज गंगाधरनंदना[1] करीं नमन;
तूं साच विघ्नहर्ता त्वच्चरणीं म्हणुनि होय लीन मन. १
करुणासिंधो बाळा! स्तवितों वंदूनियां तुला आधीं;
त्वत्कीर्तिगान हरितें भजकांच्या सर्वथा मनोव्याधी[2]. २
मान्यवरा मागतसें स्वीकारीं अल्पशीच ही सेवा;
त्वद्गुणगानीं कैंचा अत्यल्प मदीय बुद्धिचा केवा[3]? ३
न्यायें, धर्में, संतत हिंदमहीच्या[4] हितार्थ झटलास;
ज्ञानतपःसामर्थ्यें जगतीला देवसाच[5] गमलास. ४
यत्नसहस्रें श्रमसी राजकरीं तें स्वराज्य[6] मिळवाया;
आर्यजनांतें वाटे निजजीवन ज्याविना निखिल वांया. ५
बा राष्ट्रसूत्रधारा[7]! तुज वंदुनि कोण होय ना तरला?
वाटसि जनांस साक्षात् 'भूद्धरणालागिं देव अवतरला'. ६

---

१ गंगाधरपुत्रा! गंगाधर हें लोकमान्यांच्या वडिलांचें नांव होतें. (पक्षीं) गंगाधर अर्थात् शंकर, त्याच्या पुत्रा-गणपते! काव्यारंभीं मंगलदायक गणपतीचें स्तवन करण्याची वहिवाट आहे. २ मानसिक व्यथा. ३ पाड. ४ हिंदुस्थान देशाच्या. ५ देवसमान. ६ आंग्लसत्तेखालीं साम्राज्यांतर्गत स्वराज्य. ७ करवीरचे शंकराचार्य कुर्तकोटी स्वामी यांनीं लोकमान्यांस त्यांचे निधनाआधीं थोडेच दिवस 'राष्ट्रसूत्रधार' ही पदवी दिली होती.

लावुनि तन, मन, धन तें, देशहितीं जाहलासि सन्महितें[1];
अनुकरण तव गुणांचें करिल भवीं या नितांत[2] जन्महित. ७
यश थोर सत्कृतींनीं साधो ! भुवनत्रयांत गाजविलें;
निज निर्मलचरितें त्वां साधुजनांतेंहि परम लाजविलें. ८
तिलका त्रैलोक्याच्या आर्यमहीभूषणा महाभागा !
निजसुयशें बा सुव्रत[3] ! महिच्या त्वां उजळिलें दहा भागां. ९
लक्षावधी जनांतें पूज्य जहालासि तूं सदाधारा[4] !
त्वद्वाणी[5] त्यां गमली मधुर सुधेचीच[6] कीं सदा धारा. १०
कारागृहदुःखहि तें राष्ट्रहितीं सोशिलेंसि बलवंता[7] !
धीरत्वें, शीलत्वें तुजसम बा तूंचि एक गुणवंता ! ११
यच्छ्रवण नित्य सुखविल नवनव देऊनियां मना रुचितें[8],
ऐसें न कोण गाइल मोदभरें[9] त्वच्चरित्र अतिशुचि[10] तें. १२
नम्रत्वें विनवितसें त्वच्चरित अगाध सिंधुसें[11] कोठें ?
कोठें मदीय जडमति ? केलें परि धाष्टर्य साच हें मोठें. १३
मोरोपंत कवीच्या मान्या आर्यांस जाहल्या आर्या;
आर्यावृत्तीं म्हणुनी प्रायैः[12] तुजलागिं संस्तवीं[13] आर्या ! १४
स्तुतिशतकीं गातिल तुज नवनव किति कवनचतुर सुकवी ते;
नीरस जरि हें तुजला होइल भक्तिप्रियास सुखवीतें. १५
ते कविवर, मुनिवर तुज, सुरवर तेवींच करिति संन्नमनें[14];
भवतापमुक्तिलागीं करिजेल तसेंच म्यां प्रसन्न मनें. १६

---

१ साधूंस मान्य. २ अत्यंत. ३ सदाचारा ! ( संबोधन ). ४ सज्जनांच्या आधारा. ५ तुझें भाषण. ६ अमृताची. ७ लोकमान्यांचें नांव बळवंत होतें. ८ गोडी. ९ अत्यंत आनंदानें. १० अत्यंत पवित्र. ११ समुद्रासारखें. १२ बहुधा. १३ स्तवन करतों. १४ अंतःकरणपूर्वक नमनें.

## प्रकरण पहिलें.

# जन्म, बालपण वगैरे.

"श्रीशस्वरूपाय, जनप्रियाय, त्रिलोकवंद्याय, यशोधनाय,
नमोऽस्तु धीराय, दयामयाय, बालाय, गंगाधरनंदनाय."

आर्या.

श्रीभारतभूं[1]दक्षिणदेशीं बहुरम्य देश तो आहे;
अन्वर्थक[2] 'रत्नागिरि' नामें जो थोर शोभुनी राहे. १
शश्वत्पुष्पित[3] वल्ली, फलतरु[4] पनसाम्र[5], सजल ते ओढे,
गुणरत्नाकर[6] जनता, कवणाचें चित्त ना तिथें ओढे? २
स्वच्छत्व, पवित्रत्वहि महिचें या रत्नसेंच गाजतसे;
मानवरत्नां प्रसवे, 'रत्नागिरि' म्हणुनि नाम साजतसे. ३
रूपा यदीय एके बाजूनें शोभवी उदधि रुचिर;
सह्याद्रि दुसरियानें देउनि सौंदर्य पोषवी सुचिर. ४
पादप[7] उत्तुंग[8] किती? ज्यांवरि बैसूनि विहगगण[9] गाय;
गांठाया जणुं जाती नभ; शोभा वर्णिली न ती जाय. ५
यद्भूमिलागिं शाद्वल[10] सस्यक्षेत्रें[11] नितांत शोभविती;
त्यांतुनि झुळझुळ उदकें वाहति; तीं चित्त थोर लोभविती. ६
जननेत्रां सौंदर्यें रंजविता होय सह्यगिरि परम;
जो वन्यश्रीस कथी 'कांते! मत्संगतीं इथेंच रम.' ७
नटली वाटे शालू नेसुनियां रम्य सृष्टि हृष्टमती[12];
शोभा नैसर्गिक[13] कीं कृत्रिम त्या येथ रंगल्या गमती. ८

---

१ हिंदुस्थानच्या दक्षिण दिशेला. २ अर्थाला अनुसरून. ३ सदोदित फुलें धारण करणाऱ्या. ४ फलझाडें. ५ फणस व आंबे. ६ गुणरूप रत्नांची जणु खाणच; सद्गुणी लोक. ७ वृक्ष. ८ अत्यंत उंच. ९ पक्षिसमूह. १० हिरवीगार. ११ धान्यांचीं शेतें. १२ आनंदित. १३ स्वाभाविक.

प्रिय अन्य भू न भार्गवराममना[1], जेंवि होय भूमी ही;
तेणें ब्राह्मण्यादिक गुणगण[2] ये येथ करुनि 'मी मीही'[3]. ९
या पुण्यरत्नभूमीं घेते झाले जनीस[4] किति सुकृती[5];
गाया विषय जहाल्या ज्यांच्या सर्वत्र महिवरी सुकृती[6]. १०
यश निजविद्यार्जित तें ज्यांहीं द्वीपांतरींहि[7] दूरवर
गाजविलें, ऐसे किति जन्मति येथेंच थोर विप्रर्वर[8]. ११
त्रिभुवनजनशंसित जो आर्यमहीतिलक तिलक नररत्न,
त्या हीच जन्मवुनि भू गेय जनां होय करुनि चिर यत्न. १२
लोकमनीं अभिनव ती केली राष्ट्रीय जागृती जेणें,
त्या राष्ट्रसूत्रधारा प्रसवे; मान्यत्व पावली तेणें. १३
करिती झाली सद्गुणपुत्रप्राप्त्यर्थ ही तपश्चरण;
सुप्रीत ईश तेणें देता हो तनय जगदलंकरण[9]. १४
वंद्यत्व[10] गुणिजनांमाधिं पावे चिर तिलकवंश तो महित;
सात्त्विक वृत्ति, स्थिर धी, प्रेम, दया, होय या गुणीं महित. १५
द्याया जनते[11] विद्यादाना यत्पुरुष सर्वदा श्रमले;
ब्राह्मण्य निखिल रमलें मोदभरें येथ, जनमना गमलें. १६
यम, नियम, तप, अहिंसा, इतरहि गुण ते कितीक सांगावे ?
कल्याणेच्छु जनानें ज्यांतें परिसूनि नित्यशा गावें. १७
यद्गेह[12] शांततेचें, आनंदाचें तसेंच माहेर;
धर्माचें, कीर्तीचें वसतिस्थल शुद्ध आंतबाहेर. १८

---

१ परशुरामाच्या मनाला. (परशुरामानें ही भूमि, ब्राह्मणांस वसतिस्थान म्हणून नेमून दिल्याचें पुराणांतरीं आहे.) २ ब्राह्मण्यास—ब्राह्मणपणास—आवश्यक असे व इतर गुणसमुदाय. ३ मी मी करीत-सरसावून-पुढें आले. ४ जन्माला. ५ धन्य. ६ सत्कृत्यें. ७ देशांतरीं देखील, विलायतेसारख्या दूर ठिकाणीं देखील. ८ ब्राह्मणश्रेष्ठ. (रावसा. मंडलिक, न्यायमूर्ति रानडे, नाम. गोखले, रँग्लर परांजपे वगैरे कित्येक नामांकित विद्वद्रत्नें रत्नागिरींतच जन्म पावलीं आहेत. ९ जगताला अलंकारभूत. १० पूज्य. ११ सर्व लोकांना. १२ ज्यांचें—ज्या तिलकपूर्वजांचें घर.

शोभे तिलककुलीं या गंगाधरनामधेय[1] सुज्ञानी[2];
सत्यव्रत, धर्मात्मा, ज्ञाता; स्तविला म्हणून सुज्ञांनीं. १९
धन्य श्रीगंगाधर, तद्दयिता[3] धन्य ती सदाचार[4];
अवतरला ज्यां उदरीं पुण्यात्मा कर्मवीर साचार[5]. २०
नाशी क्षणांत आश्रितजनदुःखनगांसि यत्कृपालहरी,
तो बालरूप भारतभूद्धारीं अवतरे दयाल हरी. २१
यद्गीता जनतेला सुखविति झाली जशी सदैव सुधा[6],
त्या बालतिलकजन्मीं, कृष्णजनीं[7] तेविं, हर्षली वसुधा[8]. २२
न कदा बालवयांतहि बाळमना क्रीडनांत हो रति[9] ते;
निजतां, बसतां, उठतां गमलें ध्येय स्वराज्य तन्मतितें. २३
मोदप्रिय पितरांतें झाले ते विविध सुगुण तनयाचे;
‘सुरगुरु[10]’ म्हणति ‘न होइल शक्त कराया यशःकथन[11] याचें.’ २४
स्तुतिपात्र गुरुजनांतें विद्याभ्यासीं समस्त तो झाला;
ज्ञानागम[12] सकलहि ज्यां वाटे येथें वसावया आला. २५
धी[13] स्थिर, विमल प्रज्ञा, विद्यारुचि ती कितीक सांगावी?
आप्तजनांहीं कुतुकें बालाची कीर्ति नित्यशा गावी. २६
राष्ट्रीय निज अधोगति[14] तन्नेत्रीं सतत होय जी सलती[15],
चेतविती कीं झाली चित्तीं त्या राष्ट्रभक्ति उज्वल ती. २७
यद्वाचन, यल्लेखन, यद्भाषण नित्य साच निजदेश;
‘राष्ट्रार्थ देह झिजवा’ बालपणींही यदीय उपदेश. २८
दशवर्षात्मक[16] होतां पुण्यपुरीलागिं आणिती बाळ;
तद्दर्शनोत्सुका जी होती घोटीत बैसली लाळ. २९

---

१ गंगाधर नांवाचे. (गंगाधरशास्त्री, लोकमान्यांचे वडील). २ विद्वान्. (गंगाधरशास्त्री यांचा धंदा शिक्षणाचाच असून हे उत्तम वैयाकरण होते.) ३ त्यांची स्त्री. (लोकमान्यांची आई.) ४ सदाचरणी. ५ खरोखर. ६ अमृत. ७ कृष्णजन्माप्रमाणेंच. ८ पृथ्वी. ९ आवड. १० बृहस्पति. ११ यशोवर्णन. १२ ज्ञानप्राप्ति. १३ बुद्धि. १४ अवनति. १५ जाच करणारी. १६ दहा वर्षांचा. (लोकमान्यांना त्यांच्या वडिलांनीं दहाव्या वर्षी पुण्याला आणिलें.)

यावा सौभाग्याचा मम तिलक गृहा म्हणूनि हौस पुरी
धरुनी चिर जी बसली, आनंदे पुण्यशील पुण्यपुरी. ३०
मन, बुद्धि योजुनीयां नृपभाषा[1] आंग्ल, तीप्रती सेवी;
झाली प्रसन्न त्यावरि भक्तिवशा तीहि शारदा[2]देवी. ३१
यापरि अभ्यासीं रत साधी बी. ए. यशस्य[3] पदवी ती;
सकलहि आप्तजनांच्या चित्ता जी थोर होय सुखवीती. ३२
यत[4]चित्त अचिर साधी न्यायाची 'न्यायनिपुण'[5] ती पदवी;
श्री-कीर्तिहेतु[6] साचचि तच्चित्तीं लेश ना परी मद[7] वी. ३३
बाल्यीं, तारुण्यांतहि विभवपदेच्छा[8] कदा न त्या रुचली;
जनपद[9]सेवा केवल सुतपस्या[10] एक तन्मना सुचली. ३४
लाहो ज्यातें 'वाहिन निजमन चिर राष्ट्रदेवताचरणीं';
संतत उच्चारीं कीं होय विचारीं तशीच तत्करणी. ३५
यत्नीं श्रमला संतत संस्कृति कीं शील आर्य राखाया;
शकला न अरिहि कोणी कुयशें त्या तनुस विमल माखाया. ३६
गंगाजलसम निर्मल तच्चित्त सदैव सत्पथीं रमलें;
सत्कीर्तिसुंदरी ती आली धुंडित तदीय पदकमलें. ३७
गाय महाराष्ट्रमही सादर, सानंद ज्यासि काव्यशतें,
झालें त्या पंथदर्शक[11] मालाकाराख्य[12] विष्णुचें[12] यश तें. ३८
धन्यत्व विष्णु पावे सुगुणीं, सद्दीप जेविं तेजानें,
भारत[13]महिला दिधली जागृति नव दिव्यरूप ते ज्यानें. ३९

---

१ राजभाषा, इंग्रजी भाषा. २ सरस्वती. ३ यशो-दायक. ४ चित्ताचें नियमन करणारा. ५ एल्एल् बी. परीक्षा. ६ संपत्ति व कीर्ति या दोहींना कारणभूत. ७ गर्व. ८ श्रीमंतीची इच्छा. (केवळ तीस रुपये दरमहाच्या वेतनावर फर्ग्युसन कालेज वगैरे संस्थांत लो. टिळक काम करीत होते.) ९ देशसेवा. १० उत्तम प्रकारचें तप. ११ मार्गदर्शक. १२ मालाकार नांवाचे–निबंधमालेचे संपादक. (विष्णुशास्त्री चिपळूणकर हे मालाकार ह्या नांवानें प्रसिद्ध होते.) १३ हिंदुस्थान देशाला.

रतला संतत निजजन[1]पदहितकार्यांत जो तनमनानें,
आगरकर न कुणातें होय स्तवनार्ह[2] थोर नमनानें ? ४०
नंदक[3] पुण्यपुरीतें झाली ज्याची सुलेखनी[4] चिर ते,
त्या सद्गुणागरकरा[5]संगीं श्रीबाळ तो सदाचि रते. ४१
दत्तत्रिमूर्ति चित्ता गमती हे विष्णु-बाळ-गोपाल;
संतर्पित[7] यां करितां प्रमुदित तो कां न होय गोपाल[8] ? ४२
नाना शिक्षण[9]संस्था, आंग्लें[10], मराठी[11]हि तेविं तीं पत्रें
काढुनि उभविति जे कीं निखिला जगतीं सुकीर्तिचीं छत्रें. ४३
यत्नीं श्रमले संतत भारत[12]जनमोहतम हरायाला,
कीं ज्ञानरूप[13] सत्रीं जनता संतृप्त ती करायाला. ४४

---

१ स्वदेशाच्या हितकर अशा प्रत्येक कामीं. २ स्तुतीला पात्र. ३ आनंद देणारी. ४ उत्तम लेखणी, अर्थात् उत्तमोत्तम लेख. ५ गुणसंपन्न आगरकरांचे संगतींत. (कै० आगरकर व लोकमान्य हे केसरी, फर्ग्युसन कालेज आणि न्यू इंग्लिश स्कूल इत्यादि संस्थांत सहकारित्वानें काम करीत असत). ६ विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य तिलक, व गोपाळराव आगरकर. ७ तृप्त. ८ कृष्ण परमात्मा. ९ पाठशाला. (फर्ग्युसन कालेज, न्यू इंग्लिश स्कूल वगैरे संस्था.) १० इंग्रजी ('मराठा' पत्र). ११ 'केसरी' पत्र. १२ हिंदुस्थानवासी जनांचें अज्ञान. १३ ज्ञानाचें सत्र घालून जनांना ज्ञानसंपन्न करण्याकरितां.

## प्रकरण दुसरें.

# जनसेवा व तत्प्रीत्यर्थ आत्मयज्ञ.

“ धन्य सुशीला तिलका तुजसम ना इतर जाहलाचि कवि,
तव शील, तव शुचिव्रत[1], जनसेवा तव, निकाम[2] जो शिकवि.”

आर्या.

धन्य श्रीतिलकचरित परिसुनियां कंठ गंहिवरें दाटे;
वाटे गावें, दाविल राष्ट्रहिताच्या सुरम्य जें वाटे. १
न्यस्तस्वार्थ[3] जनहितीं होउन रत त्या त्रिमूर्ति[4] एकमतीं
निद्रित राष्ट्रा जागृति द्याया वेंचून धनमना श्रमती. २
‘सुरगुरु पुण्यपुरीचा’[5] म्हणुनि जनें ज्यासि निखिल मानावें,
त्या कृष्णाचा सुत हा विष्णु सुधी[6]; या तसेंच वानावें. ३
शील, सुविद्या, संस्कृति इत्यादिक सद्गुणीं अति ग्रथित[7],
ती आर्यभूमि दुर्गत[8] पाहुनियां होय विष्णु तो व्यथित. ४
लावी भारतमहिच्या उद्धारार्थी[9] स्वदेह, धन, चित्त;
देशोन्नति एकचि ती वाटे ज्या देव, धर्म, कीं वित्त. ५
तितुकी न राजसेवा, जनसेवा जितुकी त्यास उत्सव दे;
सेवेंत दुज्यां[10] रमला, जन अखिलहि ‘धन्य, धन्य’ त्यास वदे. ६

१ पवित्राचरण. २ अत्यंत. ३ स्वार्थत्याग करून. ४ तिघे. ( विष्णुशास्त्री, लोकमान्य व आगरकर. ) ५ पुण्यांतील बृहस्पति. ( विष्णुशास्त्री यांचे वडील कृष्णशास्त्री चिपळूणकर यांची बुद्धिमत्ता एवढी थोर होती कीं त्यांस त्या वेळीं पुण्यांत ‘बृहस्पति’ असें नांव पडलें होतें. ) ६ बुद्धिमान्. ७ प्रसिद्ध. ८ दुःखग्रस्त. ९ हिंदुस्थानच्या उन्नतीकरितां. १० दुसऱ्या सेवेंत, जनसेवेंत.

लववांया[1] लावी जी प्रेमें पितयासि मान बहुधा ती
प्रकटी निबंधमाला. जनचित्तें कां न होति बहु धार्ती[2] ? ७
कार्यीं सहाय कीं त्या आगरकर घे करांत केसरितें[3];
लेखनचातुर्यीं त्या कुणिहि न पावेल त्याचिया सरितें[4]. ८
तुल्य न ज्याशीं कोणी, धीरत्वीं तिलक तो महायासीं[5]
प्रकटी आंग्ल 'मराठा' जागृत जनमानसा करायासी. ९
जनतांधतमस[6] सत्वर नाशाया ज्ञानदीपतेजानें[7],
ते ज्ञानमंदिरांतें[8] संस्थापिति, होय कीर्ति ते ज्यानें. १०
समशील कितिक येउनि मिळति तिघां त्यां सुविद्य[9] धीरमती;
एकत्र राष्ट्रकार्यीं निष्कामत्वें यदीय धी रमती. ११
मरणोन्मुखा अमृतसें ज्ञानौषध रुग्णं[10] भारत[11]क्षितितें.
द्याया सिद्ध जहाले. भव्येच्छु[12] न कोण करिल त्यां नतितें[13] ? १२
नाना प्रचलित विषयीं चर्चेतें जनहितार्थ कीं करिती
पत्रद्वयांतुनी[14] त्या; अधिकृत[15]जनरोष नित्यही वरिती. १३
इकडे करवीराभिध[16] शिवकुलजांचें[17] प्रसिद्ध संस्थान,
तच्छासन[18]रीति महाचर्चेचें होय जनमुखीं स्थान. १४

---

१ कृष्णशास्त्री यांना आपल्या चिरंजिवांचे निबंधमालेंतील लेख वाचून मोठें समाधान व कौतुक वाटत असे. २ संतुष्ट. ३ केसरी वर्तमानपत्र. ४ तुलनेला. ५ अत्यंत श्रमपूर्वक. ६ लोकांचें अज्ञान हाच कोणी काळोख, त्याला. ७ ज्ञानरूप दिव्याच्या उजेडानें. ८ शिक्षणविषयक संस्था. ९ विद्वान्. (विष्णुशास्त्री, लो. तिलक व आगरकर यांनीं चालविलेल्या न्यू इंग्लिश स्कूल वगैरे शिक्षणविषयक संस्थांस मागाहून रा. नामजोशी, धारप, केळकर, आपटे वगैरे अनेक विद्वान् व स्वार्थत्यागी मंडळी येऊन मिळाली होती.) १० रोगी. ११ भरतखंडाला. १२ कल्याणेच्छु. १३ नमस्कार. १४ केसरी व मराठा पत्रांतून. १५ अधिकारी मंडळीच्या रोषास पात्र झाले. १६ कोल्हापुर नांवाचें. १७ शिवाजी महाराजांच्या वंशजांचें. १८ तेथील राज्यकारभार.

तद्विषयक लेखांहीं आगरकर, तिलक संकटां आप्त
 होउनि मासचतुष्टय कारागृह घेति करुनि संप्राप्त. १५
रतचित्त राष्ट्रकार्यीं कारागृहवसति सोसिती सहजीं;
 हो अन्यथा जनांतें अपमानद शोककर सुदुःसह जी. १६
जाणों धीरत्वाचा देउनि त्यां प्रथम पाठ, कारा[2] ती
 सांगे 'स्वराष्ट्रदेवा संतर्पा तनमनें दिवारातीं'. १७
हतभाग्य महाराष्ट्र, स्वर्गतिला अचिर विष्णु कीं जाय!
 भारतभाग्यलतेची कालें कलिकाच तोडिली हाय! १८
लावुनि राष्ट्रपदीं मन जेणें राष्ट्रस्वरूप धवळावें,
 त्यालागिं हाय! कालें अविचारेंकरुनि काय कवळावें? १९
चिर रम्य विष्णुपुरितें[3] विष्णु सुधी[4] चालतां रहायाला,
 तिलकाविना न गमला तत्कार्यधुरा[5] कुणी वहायाला. २०
कर्तव्यशून्य होतां भारतभू, दास्य ये तदीय करीं,
 दावुनि तिलक जनांतें कर्मीं[6] त्यां सर्वथा प्रवृत्त करी. २१
विस्तृत भारतविषयक[7] पूर्णत्वें राजकारणीं भाग,
 घ्याया उभयहि पत्रां स्वामित्वें[8] घे करीं महाभाग. २२
'तत्परता सत्कार्यीं, विद्याव्यासंग, साहसीं रति ते',
 सांगे 'या आर्यगुणां[9] सेवुनि पावाल सत्य उन्नतितें[10].' २३
वर्धन, संगोपन तें व्हाया जनतेंत राष्ट्रधर्मांचें,
 गणपति-शिवरायोत्सव[11] संस्थापी मूलहेतु शर्मांचे[12]. २४
शीघ्र स्वराज्य घ्याया मेळवुनी भारतासि नृपतिकरीं[13]
 सांम्राज्यांतर्गत[13] कीं, तपला श्रमसाहसांचिया निकरीं[14]. २५

---

१ त्यासंबंधीं केसरी—मराठ्यांत आलेल्या लेखांवरून. २ तुरुंग. ३ वैकुंठाला. ४ विद्वान्. ५ विष्णुशास्त्र्यांनीं आरंभिलेल्या कार्याचा भार. ६ कर्ममार्गांत. ७ हिंदुस्थानसंबंधीं. ८ मालकीनें. ९ आर्यपूर्वजांच्या गुणांना. १० मोठेपणाला. ११ गणपतीचे मेळे व शिवाजिउत्सव. १२ कल्याणाचे. १३ राजेसाहेबांकडून कित्येक वसाहतींस दिलें गेलें आहे, त्याप्रमाणें. १४ निकर-गर्दी; अत्यंत परिश्रम व साहस स्वीकारून.

काव्य ५५९

'लय पावले समृद्धहि अंतःकलहें[1]करूनि किति देश';
राष्ट्रार्थ म्हणुनि साधा ऐक्या जन हो !' यदीय उपदेश. २६
तप्त न चित्तीं झाला कारावसति[2] द्विवार[3] जरि लाहे;
'साधेल राष्ट्रहित या मद्दुःखीं' म्हणुनि शोक ना वाहे. २७
वर्षें सहा वसे तो एकांतीं तेथ करित सुतपातें,
क्षुब्ध न काराक्लेशें, क्षुब्ध न तेवींच दारस्मृतिघातें[4]. २८
शुचि[5] तद्यश मळवाया श्रमल्या तपें सार्ध[6] कितिक त्या खलधी[7];
निजभुजबलवीर्यें परि जाय तरूनीहि तो विपज्जलधी[8]. २९
चित्तसमुन्नतिकारक[9] अद्भुत 'गीतारहस्य'[10] हो करिता;
अन्यहि[11] शास्त्रग्रंथीं झाला सुमहद्यशा[12] जनीं वरिता. ३०
'व्रत सत्य नित्य ज्यांचें, प्राणांतींही न सत्य ते त्यजिती',
निजचरितें कीं दावी 'रक्षाया सत्य संत नित्य जिती[13]'. ३१
तरला अनेक संकटासिंधुस धैर्येंकरून शिवशील[14],
'या पुण्ययशःश्रवणें[15]' जन म्हणति 'मना इथेंचि निवशील.' ३२
जनपदहिततत्पर[16] तो सर्वत्र महींत पावला मान.
जन एकषष्टवर्षीं[17] अर्पिति त्या लक्ष[18], लववुनी मान. ३३
नवनव जागृति करण्या राष्ट्रहितीं नित्य देह, मन, खरची,
हिंदी स्वराज्यसंघा स्थापुनि जनमानसांत हरिखें[19] रची. ३४

---

१ आपापसांतील भांडणांनीं. २ तुरुंगवास. ३ दोन वेळां. ४ पत्नीच्या मरणरूप घातानें. (पत्नीचें निधन लोकमान्य कारागृहांत असतांनाच झालें, तथापि तत्संबंधीं क्लेश त्यांना वाटले नाहींत.) ५ पवित्र. ६ दीड तप, अठरा वर्षें. ७ कुटिल जनांचीं मनें. (ताईमहाराजप्रकरणांत लोकमान्यांना अठरा-एकोणीस वर्षें त्रास झाला. शेवटीं त्या खटल्यांत त्यांना पूर्णपणें यश आलें). ८ संकटरूपी समुद्र. ९ चित्ताला उन्नतावस्थेला पोंचविणारा. १० लोकमान्यांचा गीतेवरील टीकाग्रंथ. ११ दुसऱ्याहि इंग्रजींत लिहिलेल्या Orion व Arctic Home of the Vedas ह्या ग्रंथांनीं. १२ मोठी कीर्ति. १३ जीवंत रहातात. १४ कल्याणरूपी शील—स्वभाव—ज्याचा असा. १५ ही पुण्यकीर्ति ऐकल्यानें. १६ राष्ट्रकार्यांत तत्पर. १७ एकसष्टाव्या वर्षीं. १८ लाख रुपये. १९ आनंद.

सेवे राष्ट्राच्या हा फिरला सर्वत्र काढुनी दौरे,
स्तविला जयजयकारीं अर्पुनि धन, मान बहुजनें पौरें. ३५
वाहुनि तद्रथ नेती सोडुनि वाजींस[1] जन महाहर्षी;
वातायनस्थ[2] ललनागण सुमनांतें[3] तयावरी वर्षी. ३६
तनुयंत्र[4] जर्जरित हो संतत कष्टेंकरूनि जरि काय,
नृपतिस भारतदुःखां कळवाया आंग्लभूमिला[5] जाय. ३७
वर्षावधि[6] वसुनि तिथें भारतसंदेश[7] नृप-जनां[8] कळवी,
आळवुनी, आर्जवुनी तन्मन या दीन भूकडे वळवी. ३८
निर्मल यश संपादुनि आर्यमहीलागिं[9] तेथुनी परते,
जयजयकारीं त्याच्या रोमांचितकाय[10] सर्व लोक रते[11]. ३९
कार्या राष्ट्रसभेच्या अमृतसरा[12] जाय मग यशःसदन[13],
राष्ट्रसभासुंदरिचें हर्षभरें दिव्य विकसलें वदन. ४०
मतभेद सर्व निरसुनि साधी ऐक्यास हिंदु-यवनांचे,
त्या अश्रुतपूर्व यशें आर्यावर्त प्रसन्नमन नाचे. ४१
जोडूनि कीर्ति ऐशी पुण्यपुरीलागिं ये महाभाग,
'संतत देशोद्धारीं' बुध म्हणति 'असाच तूं महा भाग[14]'. ४२
शिवशिव परि दुर्दैवें तद्देहीं गेहें[15] जो करी ताप,
तो नाम यथार्थ[16] करी निखिला जगतीस देउनी ताप. ४३
करुनि विनंतिस आणी मुंबा बंधूस त्या स्वसदना कीं;
करि 'हाय' 'हाय' पाहुनि नेतां त्या सिद्ध[17] नाकसद[18] नाकीं[19]. ४४
विधिहि[20] चतुर्मुख[21] जेथें अत्यद्भुत अंत्यें[22] त्या समारंभा[22],
वर्णू न शक्त होइल, मी तरि तों केंवि करुनि आरंभा? ४५

---

१ घोडे. २ खिडक्यांत बसलेल्या. ३ फुलें. ४ शरीर. ५ इंग्लंदाला. ६ एक वर्षपर्यंत. ७ हिंदभूमीचा निरोप. ८ भारतमंत्री व इतर अधिकाऱ्यांना. ९ हिंदुस्थानाला. १० आनंदानें रोमांचित झालेले. काय-शरीर. ११ रममाण झाला. १२ अमृतसर येथील राष्ट्रसभेला. १३ यशाचें मंदिरच कीं काय असे (लोकमान्य). १४ श्रम करीत रहा. १५ वसतिस्थान. १६ खरें. १७ सिद्ध-सज्ज होऊन. १८ देव. १९ स्वर्गी. २० ब्रह्मदेव. २१ चार मुखांचा. २२ अंत्यदर्शनाच्या समारंभाला.

## प्रकरण तिसरें.

# गुणवर्णन.

"श्रीगंगाधरनंदन बाला तिलका तुला असो नमन;
तव सुयशावांचुन त्या रंगो इतरत्र मम कदा न मन."

आर्या.

श्रीमत्पुण्यपुरीचा[1] तिलक श्रीतिलक सानथोरांतें[2],
  झाला उपास्य[3] जगतीं संतत, घन[4] जेंवि होय मोरांतें. १
गंगाधर[5] देववर[6] श्रीशंकर जेंवि होय तो महिला[7],
  जनचित्ता तिलक तसा गमला वंद्यांत वंद्य कीं पहिला. २
गाया योग्य तिलक हा सत्यव्रत, सत्वशील, सच्चरित;
  आमरण राहिला जो जनसेवासुव्रतास[8] आचरित. ३
धर्म तयातें गमला जनसेवा एक, कीं स्वदेशहित;
  सुखद तसें नच झालें तच्चित्ता किमपि अन्य यांरहित. ४
रतला यासम न कुणी भारतभूद्धार तो करायास;
  तत्सिद्ध्यर्थी श्रमला; वर्णु शकें केविं मी तदायास[9]. ५
नंदमना[10] कृष्ण जसा आर्यावर्तास[11] होय तोषद[12] हा;
  कीं धवल महा येणें केले निजकीर्तिनें दिगंत दहा[13]. ६
दर्शन तदीय झालें जनतेला देवदर्शनासम तें,
  शुद्धाचारें[14] कीं तें आलें देवत्व त्याजला गमतें. ७

---

१ पुण्यपुरीला तिलकभूत—भूषणभूत. २ लहानमोठ्यांना. ३ पूजनीय. ४ मेघ. ५ गंगा मस्तकीं धारण करणारा श्रीशंकर. ६ देवश्रेष्ठ. ७ पृथ्वीला. ८ लोकसेवारूपी व्रतास आचरणारा. ९ त्याला (लोकमान्यांना) झालेले—पडलेले श्रम. १० नंदाला कृष्ण जसा आनंदजनक झाला त्याचप्रमाणें. ११ भारतमहीला. १२ आनंदजनक. १३ दहा दिग्भाग. १४ पवित्राचरणानें.

न कदा चंचल लक्ष्मी स्मितवदनें तन्मुखाकडे पाहे,
सत्कीर्तिसुंदरी परि तच्चरणीं सर्वदा सुखें राहे. ८
बाह्याभ्यंतर[1] शुद्धाचारें जो लोकमान्यता पावे;
तत्पदकमलावरि तें कां न जनें आत्मचित्त अर्पावें? ९
लावी देशहितीं मन मानुनियां देव, धर्म, तप तेंची;
तीर्थहि तें, क्षेत्रहि तें, व्यवसायीं इतर ना क्षणा वेंची[2]. १०
तिळतिळ तन्मन तुटलें हिंदमहीच्या हितार्थ जन्मवरी[3];
तेणेंच कीर्ति विमला राहे ढाळीत त्यावरी चवरी. ११
लक्षावधि जन ज्याचे संतत गाती गुणां परम-हर्षीं,
वाटे सासूय[4] मनीं तेणें होतील ते पर-महर्षी[5]. १२
कार्यें जनहित[6]कारी संस्थापुनियां श्रमे तदर्थ[7] महा,
होउनि तत्स्मारक तीं जनताचित्ता नितांत[8] देति मह[9]. १३
तुल्य न याशीं कोणी निजराष्ट्रोद्धार[10]सुव्रतीं गमला;
नृपरोषीं[11] पावुनियां कारागारीं[12]हि सुचिर जो श्रमला. १४
लावी जीवन[13]कलहभ्रांता जनते[13] सुखाचिये वाटे[14];
माता, पिता न कुणिही प्रिय यासम तन्मनासि कीं वाटे. १५
अविरत[15] उद्यम, देशप्रीति नितांत, प्रकाम पावित्र्य,
विद्वत्ता स्पृहणीया[16], अढळ मनोधैर्य, शुद्ध चारित्र्य, १६
सोशिकता, निस्पृहता, निर्भयता, परम आत्मविश्वास,
कार्यक्षमता, ऋजुता[17], यांहीं जो वंद्य होय विश्वास[18]. १७
नच विभवपदेच्छा ती तच्चित्ता स्पर्शली न जन्मवरी,
संतत भारत[19]वसुधासेवाव्यसना तदीय चित्त वरी. १८

---

१ आंतबाहेर. २ खर्च करी. ३ जन्मभर. ४ असूया-स्पर्धा-करणारे. ५ मोठमोठे ऋषि. ६ लोककल्याणाचीं कामें. ७ त्यांकरितां. ८ अत्यंत. ९ आनंद. १० स्वदेशोद्धारसंबंधीं सत्कार्यांत. ११ सरकाराच्या क्रोधाला. १२ तुरुंगांत. १३ उपजीविकेकरितां अनेक प्रकारें धडपड करणाऱ्या लोकांना. १४ मार्गाला. १५ सतत. १६ अभिनंदन करण्यालायक. १७ सरळपणा. १८ जगाला. १९ हिंदुस्थान देशाच्या सेवारूप व्यसनाला—नादाला.

महनीय[1] चरित याचें संतत आबालवृद्ध[2] गातात;
म्हणताति 'आत्मयज्ञें चित्ता गमलासि सत्य गा तातें[3]'! १९
नयनीतिधर्मशास्त्रीं यासम निष्णात कोण तो अन्य?
यल्लेखन विबुधमना म्हणविल 'तुजसमचि तूंचि हो! धन्य'. २०
तनुनें, वित्तें श्रमला आर्यावर्ता करावया जागा;
तन्मूर्ति कां न घेइल जनचित्तामाजि सर्वथा जागा. २१
वश करुनि मना लावी निजकार्यीं वा परेशसंध्यानीं[4];
सावध असतां कैसें अहित करावें स्मरादि वध्यांनीं[5]. २२
सुज्ञत्वें मतभेदां निरसुनि सर्वत्र गाजवी नांव;
संकटसिंधु[6] तराया गमला जनतेस नित्य कीं नावें[7]. २३
यद्यपि[8] न राजपदवी लाधे समरांत पावुनी विजया,
तरि लोकनायकत्वें म्हणती जन 'अनभिषिक्त[9] नृपति' जया. २४
शाश्वत राष्ट्राभ्युदयीं वेंचुनि तनु सद्यशासि साजविलें;
कुरुकुलपितामहासम[10] इहपर कीं थोर सुकृत[11] गाजविलें. २५
वांचो भारतराष्ट्र क्षितिवरि[12] होऊनि कीर्तिचें पात्र;
श्रमसाहसांत नाना येणेंच तदर्थ[13] शिणविलें गात्र[14]. २६
चुकुनिहि तच्चित्त कधीं क्षण एक असत्पथीं[15] न तें वळलें;
परघातें हस्त न तो, वदन कुशब्दें[16] कधींहि ना मळलें. २७
नित्य जनां उपदेशी 'पौरुष[17], कर्मा करून, जोडावें;
सर्वार्थसिद्धिदायी[18] कर्म, तयातें कदा न सोडावें. २८
त्या लक्ष्मीचें[19] अस्थिर पद जाणुनि, कर्मयोग आराधी;
बोधुनि इतर जनांतें आपणही कर्मनिष्ठता[20] साधी. २९

---

१ सन्मान्य. २ लहानथोर. ३ पिता. ४ परमेश्वराचे हितकर चिंतनांत. ५ कामादिक रिपूंनीं. ६ दुःखसमुद्र. ७ जहाज. ८ जरी. ९ अभिषेकसंस्कार न झालेला, मुकुटविरहित. १० भीष्माचार्यांप्रमाणें. ११ पुण्य. १२ पृथ्वीवर. १३ त्याकरितां. १४ शरीर. १५ दुर्मार्गांत. १६ वाईट शब्द तोंडांतून काढून. १७ पराक्रम. १८ सर्व कार्यांत यश मिळवून देणारें. १९ संपत्तीचें. २० कर्माचे ठिकाणीं प्रवृत्ति.

रंजवुनी ये[1]ग्रंथीं विद्वज्जनमस्तकासि डोलविलें;
'साधु[2] कृतं, 'साधु कृतं' 'साधु कृतं' बाल तिलक बोलविलें. ३०
गोब्राह्मणपालक शिवराया[3] निशिदिनिं मनांत आठविलें;
तत्सम देशहितीं रत होउनि यश तत्समान सांठविलें. ३१
इतर न यासम कोणी देखियला धीर, नयकुशल[4], दांत[5];
कांत[6] मुखश्री पाहुनि व्हावें रिपुंनींहि तत्क्षणीं शांत. ३२
तपला तीन[7] तपांवरि आर्यावर्तार्थ शिणवुनी काय[8];
पुण्यश्लोक[9]यशा घे दुर्लभ जें मानवां भवीं[10] काय. ३३
रतिहि[11] न दुःखसहस्त्रीं सत्यापासूनि पावला पतन;
जाणों दैव तयातें, भोगाया दुःख, करितसे जतन. ३४
त्रस्त न तच्चित्त करी अपमानद दुःखबहुल[12] कारा[13] ती;
विश्वास थोर ज्यातें कीर्तिदें[14] होईल अंधकारांती[15]. ३५
मस्तक सुरगुरु[16] तुकविल आनंदें, ग्रंथ तो असा मान्य
'गीतारहस्य' तेथें[17] रचुनि करी कीर्तितें असामान्य. ३६
'मन चंदनसम झिजवुनि निववावें सज्जनान्तरा साचें',
हें वर्तनांत रक्षी अनुशासन[18] पूज्य रामदासाचें. ३७
'कर्ता, धर्ता, हर्ता एकचि जगदीश मानुनी, कर्म
निष्कामत्वें करिजे, सुयशाचें हेंच,' जो कथी 'मर्म'. ३८
दावी स्वदेशसेवा करुनी ये जी सुकीर्ति जनहातीं,
तैशी न होय लभ्या वेंचुनि धनराशि अमित धनदां[19] ती. ३९

---

१ ज्याच्या ग्रंथांनीं (मराठींतील गीतारहस्य, इंग्रजींतील Orion, Arctic Home of the Vedas, व दुसऱ्या अनेक निबंधांनीं). २ फार चांगलें, शाबास. ३ शिवाजिमहाराजांस. ४ नीतिशास्त्रज्ञ. ५ इंद्रियें ताब्यांत ठेवणारा. ६ सुंदर. ७ तप=बारा वर्षांहून अधिक. लोकमान्यांनीं जनसेवा चाळीस वर्षें केली. ८ शरीर. ९ नल, युधिष्ठिर इत्यादि कीर्तिमान् पुरुषांसारखें यश मिळविलें. १० संसारांत. ११ किंचित्‌हि. १२ अनेक दुःखांनीं युक्त. १३ तुरुंग. १४ यश देणारा. १५ शंकर (अंधकासुराचा शत्रु). १६ बृहस्पति. १७ तुरुंगांत. १८ आज्ञा. १९ कुबेराला.

नमना निधनीं[१] ज्याचे लक्षावधि जमति करुनि लोक थवे;
 नमनोत्साहातें त्या कोणालागीं यथार्थ[२] हो कथवे? ४०
मग्न समस्त मही हो ऐकुनियां तिलकनिधन[३] शोकांत,
 तैसेंच तीस झालें, मालवतां जेविं दीप ओकांत[४]. ४१
नतिनुतिपूर्वक[५] मिरविति पुण्यश्लोकासि दिव्य यानांत[६];
 कां नाकस्थित[७] सुर[८] ते गातील न तद्यशा तनानांत? ४२

---

१ मृत्युसमयीं. २ बरोबर. ३ लोकमान्यांचा मृत्यु. ४ गृहांत. ५ नमन व स्तवनपूर्वक. ६ सुंदर पालखींतून. ७ स्वर्गीचे. ८ देव.

## अंत्यदर्शन.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठा...
१८२५

## प्रकरण चवथें.

# आर्यभूविलाप.

(मं. क्रां.)

हाहा! केवीं सकलहि दिशा शून्य झाल्या पहा या,
गेहीं गेहीं सकल[1] जनता शोक लागे कराया;
दुःखोद्वेगीं पिटित बसली भू महाराष्ट्र भाळ,
कीं तत्प्राण त्रिदश[2]निलया चालला आज बाळ. १
शोकावेशें मलिन[3]वसना निष्प्रभा होय सृष्टी,
नेत्रांतूनी अवि[4]रत तिच्या होतसे साच वृष्टी,
भूतें, पक्षी, पशुगणहि या शोच[5]ती दुःखकालीं,
मेघामागें लपवुनि मुखा सूर्यही अश्रु ढाळी. २
तें पावित्र्य प्रगट सगळें जेथ वासासि आलें,
ब्राह्मण्याचे विमल गुण ते जेथ सारे मिळाले;
देशोद्धाराविण न दुसरें जो न जाणे वदा[6]न्य,
गेला गेला अमरसदना[7] बाळ तो लोकमान्य. ३
शुद्धाचारें निखिल जगता होय जो वंदनीय,
झाली विद्वन्मनरमविती लेखनी ती यदी[8]य;
गांभीर्यानें अपर उदधी भासला साच जो कां,
गेला बाळ त्रिदशभुवना देउनि शोक लोकां! ४
विद्वत्तेनें विबुधजनता[9]मानसालागिं वेधी,
गीताभाष्या रचुनि सकलां कर्मयोगा निवेदी[10];
अंगीं त्यां[11]ला सुदृढ कवचा सत्यरूपी विशाल,
भूदेवीचा तिलक तिलक स्वर्गृहा जाय बाळ. ५

---

१ सर्व लोकसमुदाय. २ देवलोकाला. (त्रिदश–देव, निलय–गृह). ३ मलिन वस्त्र परिधान करून, निस्तेज. ४ एकसारखी. ५ शोक करतात. ६ उदार मनाचा. ७ स्वर्गाला. ८ ज्याची. ९ विद्वानांच्या मनाला. १० कथन करी. ११ परिधान करिता झाला.

शोचे दुःखें तिलकविरहीं आर्यभूमी अनाथा,
बाळा! संगीं तव अजवरी साच होतें सनाथा;
भूद्धारीं[1] त्वां नृवरतिलका[2] बांधिलें कंकणासी,
कार्या अंगीकृत तुजविना कोण ने शेवटासी? ६

स्वातंत्र्याची रुचि जनमनीं त्वांच उत्पन्न केली;
त्वत्कार्यांचीं सुमधुर फळें नाच दृष्टीस ठेलीं;
जाशी कोठें तव सुचरिता! राष्ट्रसत्सूत्रधारा[3]!
नेता[4] कोणी तुजसम नसे आर्यभूतें उदारा! ७

कारागारीं वसति करुनी कष्टवीला स्वदेह,
नाहीं बा! त्वां कधिंहि गणिलें सौख्य, कीं वित्त, गेह;
स्वार्थीं नाहीं तिळहि रमली त्वन्मती केधवांही,
त्वच्चारित्र्या सुरवरहि[5] ते साच गातील पाहीं. ८

ना विश्रांति क्षणहि तुजसी येथ बाळा! मिळाली,
या कीं भावें प्रिय सुरपुरी[6] त्वन्मनालागिं झाली;
किंवा कार्यीं निज नच इथें न्याय तूतें मिळाला,
स्वर्गीं बाळा म्हणुनि अजि तूं काय होसी निघाला? ९

सौख्या नाहीं तुजसि दिधलें साठ वर्षांत बाळा!
तेणें कायी व्यथितहृदयें मारिली हाक काळा?
किंवा गीताकथन अमरीं[7] इच्छिलें त्वन्मुखानें,
स्वीकारीलें म्हणुनि सदया स्वर्गती[8] काय जाणें? १०

किंवा सौख्या मम बघवलें साच तूतें न काळा!
पुण्यश्लोका म्हणुनि अदया! काय नेलेंस बाळा.
कोठें नेलें वद झडकरीं तें गुणांचें[9] निधान,
झालें व्यर्थ त्रिभुवनिं तुझें धर्मराजाभिधान[10]. ११

---

१ पृथ्वीचा—आर्यावर्ताचा—उद्धार करण्याला. २ नरश्रेष्ठा तिलका. ३ राष्ट्राच्या उत्तम नायका! ४ नायक. ५ देवश्रेष्ठहि. ६ स्वर्ग. ७ देवांनीं. ८ स्वर्गाला. ९ सकल गुणांची खाणच. १० यमाला धर्मराज अशी संज्ञा आहे. (तुझी धर्मराज ही संज्ञा ह्या कृतीनें व्यर्थ झाली आहे.)

किंवा साध्वी सुचरित तुझी सत्यभामा[1] प्रिया, जी
कंठी दुःखीं विरहदिन[2] तूं कष्टतां बंदिमाजी;
झाला नेता विरहज तिला शोक तो स्वर्गतीतें
जाशी बाळा म्हणुनि सहसा भेटण्या काय तीतें. १२

(शा. वि.)

बाळा ! जाशि कुठें अनाथ मजला दुःखार्णवीं[3] लोटुनी,
झाले लोचन[4] अंध शोकसलिलें[5], ये कंठही दाटुनी;
त्राता[6] तो जगतीं कुणी मज नसे आतां पहा राहिला,
विद्युत्पात शिरीं अकल्पित कसा कोठूनि हा जाहला ! १३
व्हावें प्राप्त मला स्वराज्य म्हणुनी बा ! कष्टलासि स्वयें,
तेणें आर्यशिरोमणे ! तुजकडे तें लोकमान्यत्व ये.
आचार्यत्वहि[7] पावसी महिवरी ग्रंथीं 'रहस्या'दिकीं[8]
शोचे[9] देख सरस्वती[10], तुजविना दुःखार्त जी कीं निकी[11]. १४
विद्वत्वें जनमानसासि गमसी 'ये भूवरी अंगिरा[12]',
श्रोत्यांचे श्रुतिलागिं[13] ती रिझविती झाली त्वदीया गिरा[14];
गांभीर्यें निज भाससी सकळिकां तूं कीं पयोब्धी[15] जसा,
स्वाराज्या[16] उपभोगण्या अवचितीं[17] बा ! आज जाशी कसा ! १५
केले सम्यगुपाय[18] शक्य सगळे ते ते तुझ्याकारणें,
नाना थोर अनामयार्थ[19] तुझिया केलींहि पारायणें;
झालें निष्फळ तें समस्त विधि[20] तो होऊनियां वांकडा,
हा हा ! टाकुनि जाशि आजि सकळां शोकार्णवाच्या कडा[21]. १६

---

१ सत्यभामाबाई हें लोकमान्यांचे पत्नीचें नांव. (ह्या साध्वी लोकमान्य मंडालेला बंदिवासांत असतां स्वर्गवासी झाल्या होत्या.) २ वियोगामुळें उत्पन्न झालेला. ३ दुःखसागरांत. ४ डोळे. ५ शोकाश्रूंनीं. ६ संरक्षक. ७ आचार्य-महाविद्वान्-ही पदवी. ८ गीतारहस्य व इतर ग्रंथांनीं. ९ शोक करते. १० शारदादेवी. ११ खरोखर. १२ बृहस्पति. १३ कर्णांना. १४ वाणी. १५ समुद्र. १६ स्वर्गींचें राज्य. १७ एकाएकीं. १८ योग्य उपाय. १९ आरोग्यार्थ. २० दैव. २१ शोकसमुद्राच्या तीरीं.

शोचे दुःखें तिलकविरहीं आर्यभूमी अनाथा,
बाळा! संगीं तव अजवरी साच होतें सनाथा;
भू[1]द्धारीं त्वां नृवर[2]तिलका बांधिलें कंकणासी,
कार्या अंगीकृत तुजविना कोण ने शेवटासी? ६
स्वातंत्र्याची रुचि जनमनीं त्वांच उत्पन्न केली;
त्वत्कार्यांचीं सुमधुर फळें नाच दृष्टीस ठेलीं;
जाशी कोठें तव सुचरिता! राष्ट्रसत्सू[3]त्रधारा!
ने[4]ता कोणी तुजसम नसे आर्यभूतें उदारा! ७
कारागारीं वसति करुनी कष्टवीला स्वदेह,
नाहीं बा! त्वां कधिंहि गणिलें सौख्य, कीं वित्त, गेह;
स्वार्थीं नाहीं तिळहि रमली त्वन्मती केधवांही,
त्वच्चारित्र्या सुरवर[5]हि ते साच गातील पाहीं. ८
ना विश्रांति क्षणहि तुजसी येथ बाळा! मिळाली,
या कीं भावें प्रिय सुरपु[6]री त्वन्मनालागिं झाली;
किंवा कार्यीं निज नच इथें न्याय तूतें मिळाला,
स्वर्गीं बाळा म्हणुनि अजि तूं काय होसी निघाला? ९
सौख्या नाहीं तुजसि दिधलें साठ वर्षांत बाळा!
तेणें कायी व्यथितहृदयें मारिली हाक काळा?
किंवा गीताकथन अ[7]मरीं इच्छिलें त्वन्मुखानें,
स्वीकारीलें म्हणुनि सदया स्व[8]र्गती काय जाणें? १०
किंवा सौख्या मम बघवलें साच तूतें न काळा!
पुण्यश्लोका म्हणुनि अदया! काय नेलेंस बाळा.
कोठें नेलें वद झडकरीं तें गुं[9]णांचें निधान,
झालें व्यर्थ त्रिभुवनिं तुझें धर्मरा[10]जाभिधान. ११

---

१ पृथ्वीचा—आर्यावर्ताचा—उद्धार करण्याला. २ नरश्रेष्ठा तिलका. ३ राष्ट्राच्या उत्तम नायका! ४ नायक. ५ देवश्रेष्ठहि. ६ स्वर्ग. ७ देवांनीं. ८ स्वर्गाला. ९ सकल गुणांची खाणच. १० यमाला धर्मराज अशी संज्ञा आहे. (तुझी धर्मराज ही संज्ञा ह्या कृतीनें व्यर्थ झाली आहे.)

किंवा साध्वी सुचरित तुझी सत्यभामा[1] प्रिया, जी
कंठी दुःखीं विरहदिन तूं कष्टतां बंदिमाजी;
झाला नेता विरहज[2] तिला शोक तो स्वर्गतीतें
जाशी बाळा म्हणुनि सहसा भेटण्या काय तीतें. १२

(शा. वि.)

बाळा ! जाशि कुठें अनाथ मजला दुःखार्णवीं[3] लोटुनी,
झाले लोचनें[4] अंध शोकसलिलें[5], ये कंठही दाटुनी;
त्राता[6] तो जगतीं कुणी मज नसे आतां पहा राहिला,
विद्युत्पात शिरीं अकल्पित कसा कोठूनि हा जाहला ! १३
व्हावें प्राप्त मला स्वराज्य म्हणुनी बा ! कष्टलासि स्वयें,
तेणें आर्यशिरोमणे ! तुजकडे तें लोकमान्यत्व ये.
आचार्यत्वहि[7] पावसी महिवरी ग्रंथीं 'रहस्या'दिकीं[8]
शोचे[9] देख सरस्वती[10], तुजविना दुःखार्त जी कीं निकी[11]. १४
विद्वत्वें जनमानसासि गमसी 'ये भूवरी अंगिरा[12]',
श्रोत्यांचे श्रुतिलागिं[13] ती रिझविती झाली त्वदीया गिरा[14];
गांभीर्यें निज भाससी सकळिकां तूं कीं पयोब्धी[15] जसा,
स्वाराज्या[16] उपभोगण्या अवचितीं[17] बा ! आज जाशी कसा ! १५
केले सम्यगुपाय[18] शक्य सगळे ते ते तुझ्याकारणें,
नाना थोर अनामयार्थ[19] तुझिया केलींहि पारायणें;
झालें निष्फळ तें समस्त विधि[20] तो होऊनियां वांकडा,
हा हा ! टाकुनि जाशि आजि सकळां शोकार्णवाच्या[21] कडां. १६

---

१ सत्यभामाबाई हें लोकमान्यांचे पत्नीचें नांव. ( ह्या साध्वी लोकमान्य मंडालेला बंदिवासांत असतां स्वर्गवासी झाल्या होत्या. ) २ वियोगामुळें उत्पन्न झालेला. ३ दुःखसागरांत. ४ डोळे. ५ शोकाश्रूंनीं. ६ संरक्षक. ७ आचार्य–महाविद्वान्–ही पदवी. ८ गीतारहस्य व इतर ग्रंथांनीं. ९ शोक करते. १० शारदादेवी. ११ खरोखर. १२ बृहस्पति. १३ कर्णांना. १४ वाणी. १५ समुद्र. १६ स्वर्गीचें राज्य. १७ एकाएकीं. १८ योग्य उपाय. १९ आरोग्यार्थ. २० दैव. २१ शोकसमुद्राच्या तीरीं.

झाली शोकनिमग्न ही प्रिय तुझी पुण्याभिधाना[1] पुरी,
काळें निष्ठुर साच ती खुपशिली पोटांत तीच्या सुरी;
टाहो फोडित केसरी[2] तव बसे संतप्त दुःखें महा,
दुःखाश्रूंस नितांत ढाळित असे हा कीं मराठा[3] पहा. १७

भुजंगप्रयात.

अकस्मात लोकान्तरा[4] बाळ गेला,
कुणी दुर्जनें प्राण माझाच नेला;
गळे लोचनीं सारखें अश्रुनीर[5],
कुणी हो! तया भेटवा; मी अधीर. १८
स्वराज्यार्थ जो कष्टला नित्य फार,
जनां वाटला आर्यभूसूत्रधार;
सदा देशकार्यी रता त्या वदान्या[6],
कुणी हो तरी भेटवा लोकमान्या. १९
तयासारिखा अन्य तो कोण धीर,
कुठें हो! वदा जाय तो राष्ट्रवीर!
जयाची मुखश्री सदा कांत[7] थोर;
कदा त्यासि पाहीन नेत्रांसमोर! २०

स्रग्धरा.

काळा धर्मप्रथा[8] रे! तुज अदय असें कोण बोलेल वाणीं?
औदार्याचीं तुझ्या या सतत जन मुखें गात राहील गाणीं.
मार्गो जातां स्वराज्या भुवनतिलक[9] हा, जोडुनी त्यांत मात्रा,
स्वाराज्यालागिं त्यातें वितरविशि, तसा शोकहि भूतमात्रा. २१

---

१ पुणें नांवाची नगरी. २ 'केसरी पत्र.' ३ 'मराठा' वर्तमानपत्र. ४ कैलासाला. ५ दुःखाश्रू. ६ दानशूराला. ७ सुंदर. ८ धर्म नांव धारण करणाऱ्या. ९ पृथ्वीला अलंकारभूत. १० स्वराज्य मागितलें, परंतु तूं त्यांत एक मात्रा घालून स्वाराज्य (स्वर्गाचें राज्य) देवविलेंस.

मालिनी.

कठिणहृदय धर्मा! केविं झालास आज,
तिलक मम हरूनि साधिलें काय काज?
झिजवुनि निजकाया चंदनाचे परी तीं,
जनहितरत जो, त्या नेसि; हे कोण रीती? २२

(व. ति.)

संगीं यदीय गुण जाति लया अशेष;
तें लोकमान्य पद होयहि नामशेष;
कीं राजकार्यचतुरत्व लयास जाय,
होसी विधे! मजसिं निष्ठुर हायहाय! २३

पृथ्वी.

तुम्हांसि कर जोडुनी विनवितें दयासागरा!
अकीर्तिकर हें प्रभो! न अदयत्व चित्तीं धरा;
यशःपरिमलें निजें उजळिल्या दिशा सर्वही,
तया फिरुनि आणवा तिलकबालरत्ना महीं. २४

अभंग.

आर्यभूमि माता, मोकलूनि[1] धाय,
म्हणे 'हायहाय! बाळ गेला'!
कोठें लोकमान्य माझा तो हो प्राण,
सद्गुणनिधान[2], कोणें नेला!
कोठें गेली माझी, अंधेची ती यष्टी!
थोर झाल्यें कष्टी, बाळावीण.
सर्व तें पावित्र्य, सर्व शुद्धाचार,
विद्वत्व साचार[3], सर्व जाय! २५

१ टाहो फोडून. २ सद्गुणांची खाण. ३ खरोखर.

'जन्मसिद्ध हक्क स्वराज्य तें पाहें,
त्यालागीं न राहें मेळविल्या.'
ऐसें तूजविना कोण सांगे आतां?
कोणी धुंडों जातां सांपडेना.
असशील तेथें राहीं सुखामाजी,
विस्मृति ते माझी होवों नेदीं.
तूंचि माझा धर्म, तूंचि माझें कर्म,
तूंचि माझें शर्म करविता.
देवा! तूझे पायीं घालीं लोटांगण,
आणीं परतोन बाळ माझा.

REFBK-0001825
REFBK-0001825